# पुणे विद्यापीठ

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(सी),(जे),(के),(एल),(एम) व (ओ) नुसार अधिसभेच्या सभेत होणाऱ्या निवडणूका.**

(१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, मधील वरील तरतूदीनुसार संबंधितांना निवडून देण्यासाठी परिनियम ३६६ व ३७३(सी) नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६, ३६८) | गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०११ दुपारी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०११ सायंकाळी ५.०० वाजता. | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०, ३७५) | रविवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०११ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६ व ३७३(सी)) | शनिवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०११ दुपारी १२.३० ते १.३० | संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ५ | मतमोजणी | शनिवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०११ ( मतदान संपल्यानंतर लगेचच ) | संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |

**(टीप : नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

**१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(सी) मधील तरतुदीनुसार अधिसभेमधून विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांपैकी एका अधिष्ठात्याची व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.**

२७ (१)(c) : One Dean elected by the Senate from amongst the Deans.

**निवड - अधिष्ठात्यांमधून अधिसभेव्दारे -**

१) १० वर्षापेक्षा कमी नसलेला अध्यापनाचा अनुभव.
२) विभागप्रमुख म्हणून किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.
३) पीएच.डी. अर्हताधारक असावा.
४) ख्यातनाम/प्रख्यात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये बारकाईने पुनर्विलोकन केलेले किमान ३ संशोधन पेपर प्रकाशित केलेले असावेत.
५) पीएच.डी. मार्गदर्शक असावा.
६) विद्यापीठ पातळीवर पेपर सेटर/परिक्षक/नियामक (Moderator) /अध्यक्ष/समन्वयक म्हणून किमान ५ वेळा काम करण्याचा अनुभव असावा.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

१) विद्यापीठ मान्यतापत्राची प्रत/प्रती. विद्यापीठ शिक्षकांसाठी नेमणूक आदेशाची प्रत/प्रती.

## २) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(जे) मधील तरतुदीनुसार अधिसभेमधून अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांपैकी दोन प्राचार्यांची व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.

(टीप : महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील संबंधित तरतुदीनुसार अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून दोन प्राचार्यांची विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक घेण्यात येणार आहे. प्राचार्यांच्या या दोन जागांपैकी एक जागा चक्रक्रमाने ठरल्यानुसार अनु. जमाती या प्रवर्गासाठी राखीव होती. तथापि, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २५(२)(एल) अनुसार अधिसभेवर निवडून आलेल्या प्राचार्यांमध्ये अनु. जमाती या प्रवर्गातील कोणीही प्राचार्य सदस्य नसल्याने पुढील चक्रक्रमाने ही जागा **इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी** राखीव आहे.

२७ (१) (j) : Two Principals elected by the Senate from amongst the Principals who are Member of the Senate of whom one Principal shall be a person belonging to the category of the Scheduled Caste or Scheduled Tribes or Denotified Tribes (Vimukta Jatis /Nomadic Tribes or Other Backward Classes)

**निवड - अधिसभेव्दारे अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यांमधून यापैकी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागासवर्ग या प्रवर्गामधून एक व्यक्ती असावी.**

१) दिनांक १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्ती झाल्याखेरीज व पीएच.डी. अर्हताधारक असावा.
२) प्राचार्य म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
३) अध्यापक म्हणून किमान १५ वर्षाचा अनुभव असावा.
४) विद्यापीठांतर्गत केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रमात पेपर सेटर/परिक्षक/नियामक (Moderator) /अध्यक्ष/समन्वयक म्हणून किमान ५ वेळा काम करण्याचा अनुभव असावा.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

अ) इ.मा.व. आरक्षित जागेसाठी उमेदवारांनी जातीचा दाखला जोडणे.
ब) प्राचार्य म्हणून विद्यापीठ मान्यतापत्राची प्रत/प्रती.

## ३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(के) मधील तरतुदीनुसार विद्यापीठ विभागातील अथवा विद्यापीठ संस्थेतील एका शिक्षकाची विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.

२७ (१)(k) : One Teacher from the University Department or University Institutions with ten years post - graduate teaching experience, who is not a Head or Director of University Department or University Institution, elected by the Senate from amongst the teachers, who are members of the Senate.

Provided that, if no teacher from the University Department or University Institutions with ten years post-graduate teaching experience is avilable then the teacher from the University Department or University Institutions with lesser experience but, in any case not less than five years post-graduate teaching experience may be considered.

**निवड - अधिसभेने त्या अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापकांमधून -**

१) विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्थेमधील असावा.
२) पदव्युत्तर अध्यापनाचा १० वर्षाचा अनुभव असावा.
३) विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा प्रमुख किंवा संचालक असू नये.
४) १० वर्षाचे अनुभवधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास किमान ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.
५) पीएच. डी. अर्हताधारक असावा.
६) विद्यापीठीय परीक्षांसाठी पेपर सेटर/परीक्षक/नियामक (Moderator) म्हणून किमान पाचवेळा काम केलेले असावे.
७) मान्यताप्राप्त/विख्यात राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन बारकाईने पुनर्विलोकन जर्नलसमध्ये किमान ३ संशोधन पेपर प्रकाशित केलेले असावेत.
८) पीएच.डी. मार्गदर्शक असावा.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

अ) १० वर्षाचा पदव्युत्तर अध्यापनाच्या अनुभवाचे व विद्यापीठ विभागप्रमुख/संचालक नसल्याचे प्रशासन शिक्षक कक्षाचे प्रमाणपत्र. १० वर्षांचा पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशा परिस्थितीत किमान ५ वर्षाचा पदव्युत्तर अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र व विद्यापीठ विभागप्रमुख/संचालक नसल्याचे प्रशासन शिक्षक कक्षाचे प्रमाणपत्र (१० वर्षाचा पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव असलेला उमेदवार उपलब्ध झाल्यास किमान ५ वर्षाचा पदव्युत्तर अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. )

## ४) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७ (१) (एल) मधील तरतुदीनुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या, १६ वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या, महाविद्यालयाचे प्राचार्य नसलेल्या संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांमधून दोन शिक्षकांची अधिसभेमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक, त्यापैकी एक जागा महिलांसाठी राखीव.

२७ (१)(I) : Two teachers from amongst the teachers of the affiliated colleges with 16 years teaching experience who is not a Principal, elected by the Senate from amongst the teachers of the affiliated colleges, who are members of Senate of whom one shall be a woman.

**निवड - अधिसभेने अधिसभेचे सदस्य असलेल्या संलग्न महाविद्यालयांच्या अध्यापकांमधून -**

१) अध्यापनाचा १६ वर्षाचा अनुभव असावा.
२) प्राचार्य नसावा.
३) यापैकी एक महिला असेल.
४) पीएच.डी. अर्हताधारक असावा.
५) विद्यापीठ पातळीवर अध्यक्ष/पेपर सेटर/परिक्षक/नियामक (Moderator) /समन्वयक म्हणून किमान ५ वेळा परीक्षेचे काम केलेले असावे.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

अ) १६ वर्षे अध्यापनाच्या अनुभवाचा प्राचार्यांचा दाखला व विद्यापीठ मान्यतापत्राची प्रत/प्रती.

**५) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(एम) मधील तरतुदीनुसार अधिसभा सदस्यांमधून अधिष्ठाता, विद्यापीठ विभागप्रमुख अथवा विद्यापीठ संचालित संस्थांचा संचालक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी प्रतिनिधी, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यापैकी कोणत्याही वर्गवारीत न मोडणाऱ्या एका व्यक्तीची व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.**

27 (1)(m) : One person, who is not a Dean, Head or director of University department, principal, teacher or student member or representative of management, elected by the Senate from amongst its member

निवड - अधिसभेने तिच्या सदस्यांमधून

अधिसभेचा असा सदस्य अधिष्ठाता, विद्यापीठ विभागाचा प्रमुख / संचालक/ प्राचार्य / शिक्षक / विद्यार्थी सदस्य / व्यवस्थापनाचा प्रतिनिधी या प्रवर्गात मोडणारा नसावा.

**६) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(ओ) मधील तरतुदीनुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या व्यवस्थापन प्रतिनिधींमधून दोन प्रतिनिधींची व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेमधून निवडणूक. (पैकी एक जागा महिलांसाठी राखीव.)**

27 (1)(o) : Two representative of the management elected by the Senate from amongst the representatives of the management of whom one shall be woman representative.

**निवड - अधिसभेने त्यांच्यामधून निवडून दिलेले - यापैकी एक महिला प्रतिनिधी असेल.**

१) पदवी पातळीवरील शैक्षणिक संस्थेत १० वर्षांचा कार्यालयीन अनुभव
२) शैक्षणिक संस्थेचा अध्यक्ष/सचिव म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव.
३) देशातील सर्वोच्च संस्थांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिखर संस्था उदा. नॅक, एनबीएद्वारे मान्यताप्राप्त संस्थेचा किंवा विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) अधिनियम २ (एफ) आणि १२ (बी) अन्वये मान्यताप्राप्त संस्थेचा प्रतिनिधी.

(२) उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करून घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जांची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/- (अक्षरी रुपये दहा) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

(३) अधिसभेच्या मतदार यादीतील कोणतेही दोन सदस्य मतदार, संबंधित मतदार यादीतील उमेदवारीस पात्र असलेल्या कोणत्याही सदस्यास उमेदवार म्हणून सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६७)

(४) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

(५) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी सभेपूर्वी चार दिवस अगोदर जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३८०)

(६) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची प्रत्येक निवडणूक प्रमाणशीर, प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार, एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमाव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

**(७) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियोक्त्याचे ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-याने दिलेले ओळखपत्र, प्राप्तीकर कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम फोटो असलेले ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका देण्यात येणार नाही.**

(८) अर्ज छाननी, मतदान आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो. (परिनियम ३७१ व ३८२)

(९) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाची परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

**(१०) उमेदवारी अर्जासोबत कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा नामनिर्देशन पत्र अग्राह्य ठरविण्यात येईल.**

(११) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच मतमोजणी होऊन निवडणुकांचे निकाल जाहीर होतील.

(१२) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम, ४५ मधील तरतूदी अन्वये कोणतीही व्यक्ती, यथास्थिती, निवडून आलेला, नामनिर्देशित केलेला, नियुक्त केलेला किंवा स्वीकृत केलेला सदस्य म्हणून व्यवस्थापन परिषदेचा लागोपाठ दुसऱ्या मुदतीकरता सदस्य असणार नाही.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. पुविनि/ 332 )
दिनांक : १८ जुलै, २०११ )

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन

( डॉ. मा. ल. जाधव)
**कुलसचिव**

**प्रति : संबंधित मतदार सदस्य.**

F:\ELECTION-2011\Academic Council\Senate to Managment Council election - Notification